**मा. मंत्रिमंडळाने दि.१५/१२/२०२१ रोजीच्या बैठकीत दिलेल्या सुधारित निर्णयानुसार पदभरतीसाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेसाठी सध्या असलेल्या OMR Vendor कंपन्यांचे पॅनल स्थगित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान),**
**शासन निर्णय क्रमांक : मातंसं-२०२२/प्र.क्र.०१/से-२/३९,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १८ जानेवारी, २०२२

**<u>संदर्भ</u>** : १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं -१२१४/२८९(प्र.क्र.१०८/१४) /१३-अ, दि. ११ मार्च, २०१५

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.मातंस-०८८/२७/२०१६-DIR IT(MH), दि. १९ सप्टेंबर, २०१७

३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिम-१२१८/प्र.क्र.२७/१३-अ, दि. १४ मार्च,२०१८

४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिम-१२१६/प्र.क्र.६५/१३-अ, दि. १३ जून,२०१८

५) साप्रवि (मातं), शासन निर्णय क्रमांक : मातंस-२०२०/प्र.क्र.११/से-२/३९, दिनांक २० फेब्रुवारी, २०२० व समक्रमांकित शुध्दीपत्रक, दि. २४ फेब्रुवारी, २०२०.

६) शासन परिपत्रक, सा.प्र.वि., क्र.प्रानिम-१२२०/प्र.क्र.२१/१३-अ, दि. १७ ऑगस्ट, २०२०.

७) साप्रवि (मातं), शासन निर्णय क्र. मातंसं-२०२०/प्र.क्र.११/से-२/३९, दि.२१ जानेवारी, २०२१

८) साप्रवि (मातं), शासन निर्णय क्र. मातंसं-२०२०/प्र.क्र.११/से-२/३९, दि.०४ मार्च, २०२१

९) शासन परिपत्रक, सा.प्र.वि., क्र.प्रानिम-१२२१/प्र.क्र.०५/१३-अ, दि. २२ एप्रिल, २०२१

**<u>प्रस्तावना</u> :-**

भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या अखत्यारीतील रिक्त पदांची पदभरती करणे, परिक्षा प्रकियाची कार्यपध्दती ठरविणे हा विषय माहिती तंत्रज्ञानशी संबंधित नाही. परंतु वर्ष २०१६ मध्ये भूतपूर्व महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळ आणि प्रादेशिक सेवा निवड मंडळ यांच्या अखत्यारीत असलेल्या तसेच विविध विभागांच्या/महामंडळांच्या/ प्रादेशिक मंडळांच्या, इत्यादी रिक्त पदांच्या भरती संदर्भातील परीक्षा ऑफलाईन ओएमआर पद्धतीने न घेता ऑनलाइन संगणकाद्वारे घेण्याचे ठरले. त्यासंदर्भात तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५ एप्रिल २०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उपरोक्त नमूद विविध विभागांच्या ऑनलाइन परीक्षेत तांत्रिक बाब अंतर्भूत असल्यामुळे ऑनलाइन परीक्षेसाठी माहिती तंत्रज्ञान संचालनालय कार्यपद्धती सुरू करील तथा त्यासाठी महापोर्टल निर्माण करील असे आदेश दिले. त्यानुसार महाआयटी मार्फत महापोर्टल विकसित करण्यात आले व त्याद्वारे महाआयटी मार्फत काही विभागांच्या परीक्षा घेण्यातही आल्या. परंतु सदर परीक्षांची व्याप्ती व आवाका पाहता तथा महाआयटीकडे उपलब्ध असलेले अपुरे मनुष्यबळ पाहता महाआयटीने सदर परीक्षा ऑनलाईन घेण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे सदर परीक्षा ऑफलाइन OMR पद्धतीने घेण्याकरिता

फेब्रुवारी, २०२० मध्ये सुधारित परीक्षा पद्धती राबविण्याचे ठरले. सदर पदे भूतपूर्व दुय्यम सेवा निवडमंडळाच्या कार्यकक्षेतील पदे असल्यामुळे सामान्य प्रशासन विभागाकडून सुधारित परीक्षा पद्धती राबविण्याकरिता सा.प्र. वि. मार्फत शासन निर्णय, क्र. प्रानिमं १२२०/प्र.क्र. २१/१३-अ, दि.१७.०८.२०२० अन्वये कार्यपद्धती व निकष ठरविण्यात आले.

OMR पद्धतीने परीक्षा प्रक्रिया तंत्रज्ञानाशी निगडित नसताना सुद्धा सामान्य प्रशासन विभागाच्या निर्देशाप्रमाणे OMR Vendor ची निवड करण्यासंदर्भात कार्यवाही MahaIT मार्फत करण्यात आली होती आणि त्यानुसार OMR मार्फत परिक्षा घेण्याऱ्या कंपन्यांचे पॅनेल दि. २४/१२/२०२० रोजीच्या उच्चाधिकार समिती ची मंजूरी घेवून या संदर्भात शासन परित्रक दि. २१/०१/२०२१ आणि दि. ०४/०३/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आले होते.

परंतु, सदर OMR Vendor मार्फत सुरु केलेल्या परिक्षा पध्दतीबाबतही विविध तक्रारी प्राप्त झाल्यामुळे तसेच विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनातही OMR Vendor विरोधात तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्यामुळे राज्य मंत्रिमंडळाच्या बुधवार दि. १५/१२/२०२१ च्या बैठकीत पदभरतीसाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेसंदर्भात पुढीलप्रमाणे सुधारित निर्णय घेतलेला आहे :-

**"पदभरतीसाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेसाठी सध्या असलेल्या कंपन्यांचे पॅनल स्थगित करण्यात येत आहे. तसेच पदभरतीसाठी यापुढे होणाऱ्या परीक्षा TCS, IBPS, MKCL यांच्या माध्यमातून घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी."**

भूतपूर्व महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळ आणि प्रादेशिक सेवा निवड मंडळ यांच्या अखत्यारीतील पदांची पदभरती ही सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारितील बाब असल्यामुळे राज्य मंत्रिमंडळाने उपरोक्त निदेशानुसार **अपर मुख्य सचिव (सा.प्र.वि.-सेवा)** यांना कार्यवाही करण्याचे निदेश दिलेले आहेत.

मा. मंत्रिमंडळाने *पदभरतीसाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेसाठी सध्या असलेल्या कंपन्यांचे पॅनल स्थगित करण्यात येत आहे*, असा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पुढील बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

राज्य मंत्रिमंडळाच्या बुधवार दि. १५/१२/२०२१ च्या बैठकीत मा. मंत्रिमंडळाने *पदभरतीसाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेसाठी सध्या असलेल्या कंपन्यांचे पॅनल स्थगित करण्यात येत आहे*, असा निर्णय घेतलेला आहे. सदर निर्णयानुसार यापूर्वी निर्गमित केलेले OMR Vendor च्या Empanelment बाबतचे संदर्भ क्र. ७ व ८ येथील शासन निर्णय क्र. मातंसं-२०२०/प्र.क्र.११/से-२/३९, दि.२१/०१/२०२१ आणि शासन निर्णय क्र. मातंसं-२०२०/प्र.क्र.११/से-२/३९, दि.०४/०३/२०२१ हे सदर शासन निर्णयान्वये स्थगित करण्यात येत आहेत. यानंतर पदभरतीसंदर्भातील कोणतीही परिक्षा उक्त शासन निर्णयान्वये Empanelment केलेल्या OMR Vendors कडून घेण्यात येऊ नये.

२. मा. मंत्रीमंडळाने TCS, IBPS आणि MKCL यांच्याकडून पदभरतीसाठी यापुढे होणाऱ्या परिक्षा घेण्याची कार्यवाही करण्याच्या संदर्भात निर्देश दिलेले आहेत. त्यानुषंगाने स्वतंत्र आदेश सामान्य प्रशासन विभागाकडून निर्गमित करण्यात येतील.

३. विविध विभागांसाठी परिक्षा पद्धती निश्चित करणे, अटी व शर्ती निश्चित करणे व कार्यपद्धती निश्चित करणे या सर्व बाबी सामान्य प्रशासन विभागाशी निगडीत असल्यामुळे संबंधित विभागांना सामान्य प्रशासन विभागांशी सल्लामसलत करुन त्यांच्या गरजेनुसार सदर बाबी अंतिम करता येतील. यापूर्वी वर्ष २०१७ पर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेत नसलेल्या पदांची पदभरती OMR पध्दतीने करण्यात येत होती. तसेच सदर पदभरतीसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, परीक्षेचे निकाल, तसेच शिफारस झालेल्या/ न झालेल्या उमेदवारांच्या याद्या संकेतस्थळावर जाहीर करणे, इ. तथा परीक्षा शुल्क सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक प्रानिमं-१२१४/२८९/ (प्र.क्र. १०८/१४)/१३-अ , दि. ११/०३/२०१५ नुसार विहित करण्यात आलेले आहेत. सदर अटी / शर्ती मध्ये कोणतीही सुधारणा करावयाची झाल्यास याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून निर्णय घेण्यात येईल.

यापुढील पद भरती परिक्षा संदर्भातील आदेश सामान्य प्रशासन विभागाकडून निर्गमित करण्यात येतील.

शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्याची सर्व जबाबदारी सर्व संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाची राहील.

सदर शासन निर्णय सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या निदर्शनास आणावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२२०११८१३२३०७७५११ असा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

LAXMAN VISHWANATH SAWANT

Digitally signed by LAXMAN VISHWANATH SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=DIRECTORATE OF INFORMATION TECHNOLOGY DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=688a5b3d7709fc50e7f86abb9560ece1e6b36c49e73184c9883005bda6ea508f, pseudonym=38A7F19EC4BD4812C10F236241DBA6161790014B, serialNumber=0CC55996ECB4B6990ECA785E8F309981FBE3F636BA7DDB9671C955B30EB347B0, cn=LAXMAN VISHWANATH SAWANT
Date: 2022.01.18 13:24:08 +05'30'

**( लक्ष्मण वि.सावंत )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
२) मा. राज्यपालांचे सचिव,
३) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
४) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
५) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
६) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
७) प्रबंधक,उच्च न्यायालय (मुळ शाखा) मुंबई,
८) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,
९) प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
११) महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,

१२) महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,

१३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

१४) सर्व पोलीस आयुक्त,

१५) सर्व विभागीय आयुक्त,

१६) सर्व जिल्हाधिकारी,

१७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,

१८) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,

१९) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

२०) सर्व नगरपालिका/परिषदांचे मुख्याधिकारी,

२१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित,

२२) सर्व मंत्रालयीन विभाग,

२३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.

२४) मुख्य परिचालन अधिकारी, ॲपटेक लिमिटेड (Aptech Limited)

२५) मुख्य परिचालन अधिकारी, जीए सॉफ्टवेअर टेक्नॉलोजी प्रायव्हेट लिमिटेड (GA Software Technologies Pvt Ltd.)

२६) मुख्य परिचालन अधिकारी, जींजर वेब प्रायव्हेट लिमिटेड (Ginger Webs Pvt Ltd.)

२७) मुख्य परिचालन अधिकारी, मेटा-आय टेक्नॉलोजी प्रायव्हेट लिमिटेड (META-I Technologies Pvt Ltd.)

२८) मुख्य परिचालन अधिकारी, न्यास कम्यूनिकेशन प्रा.लि. कंपनी

२९) मंत्रालय मध्यवर्ती ग्रंथालय, मंत्रालय, मुंबई (२प्रती)

३०) निवडनस्ती - का. ३९ (२).